बाल हक्क संरक्षण आयोग
महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास
WOMEN & CHILD DEVELOPMENT

# महाराष्ट्र राज्य
# बाल हक्क संरक्षण आयोग



# वार्षिक अहवाल

सन २०२३-२०२४

Scanned with CamScanner

# वार्षिक अहवाल

# २०२३- २४

कार्यालय

३ मजला, शासकीय परिवहन सेवा इमारत,

सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई,

महाराष्ट्र  राज्य



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# मा. मंत्री,
## महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन



**ना. श्री. मंगल प्रभात लोढ़ा**

दि. १४/८/२०२२ ते १४/७/२०२३

# माननीय मंत्री
## महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन



**ना. कु. आदिती सुनील तटकरे**

**दि. १४/७/२०२३ ते अद्यापपर्यंत**

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा



ॲड. श्रीम. सुशीबेन शाह

## महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य



ॲड. श्रीम.निलिमा चव्हाण



ॲड. श्रीम. प्रज्ञा खोसरे



ॲड. श्री. संजय सेंगर



ॲड. श्रीम. जयश्री पालवे



श्रीम. सायली पालखेडकर



श्री. चैतन्य पुरंदरे

Scanned with CamScanner

# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे सचिव



**श्री. शिवराज श्रीकांत पाटील (भा.प्र.से.)**

दि. १६/५/२०२३ ते ३१/१२/२०२३



**श्रीमती. माया पाटोळे**

१ जानेवारी २०२४ ते ६ जून, २०२४

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# अध्यक्षांचे मनोगत

कोणत्याही देशाचा खरा ठेवा म्हणजे त्या देशातील बालकं निरागस, निष्पाप, पण प्रचंड शक्यता असलेली. ही मुलं फक्त आजचे नागरिक नाहीत, तर उद्याच्या राष्ट्राचे शिल्पकार आहेत. म्हणूनच त्यांच्या बालपणाचे संरक्षण, पोषण आणि प्रोत्साहन ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला दिलेले हक्क जगण्याचा, विकासाचा, सहभागाचा व संरक्षणाचा हे मूलभूत अधिकार मुलांनाही तितक्याच ताकदीने लागू होतात. या अधिकारांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना २४ जुलै २००७ रोजी राज्य शासनाने केली.

आयोगाचा मुख्य उद्देश म्हणजे प्रत्येक बालकाला एक सुरक्षित, सशक्त व आत्मविश्वासपूर्ण जीवन जगण्यासाठी योग्य पर्यावरण निर्माण करून देणे. बाल हक्क संरक्षण अधिनियम २००५, बाल न्याय अधिनियम २०१५, लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायदा २०१२, तसेच शिक्षण हक्क कायदा २००९ यांसारख्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी आयोग विविध शासकीय विभागांशी समन्वय साधतो. आयोगाकडे येणाऱ्या प्रत्येक तक्रारीची गांभीर्याने दखल घेऊन बालकांना त्वरित न्याय मिळावा यासाठी आयोग नेहमीच सज्ज असतो. केवळ तक्रारींचे निराकरणच नव्हे, तर बालकांच्या सर्वांगीण हितासाठी कार्यशाळा, जनजागृती उपक्रम, समुपदेशन आणि विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम राज्यभर राबवले जात आहेत.

आयोगाच्या कार्यकाळात खालील उपक्रम राबविले :

१) खेळत राहा

२) बालस्नेही पुरस्कार

Scanned with CamScanner

तसेच POCSO आणि J.J. कायद्यांचे पुनरावलोकन, विभागनिहाय प्रलंबित प्रकरणांची सुनावणी, तसेच मुलांच्या पुनर्वसनासाठी विशेष प्रोटोकॉल विकसित करणे ही  महत्त्वाची पावले उचलण्यात आली. या उपक्रमांमुळे राज्यातील बालकांना न्याय, संरक्षण आणि उज्ज्वल भवितव्याची दिशा मिळण्यास मोलाची मदत झाली आहे.

आजपर्यंत आयोगाने हजारो बालकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. पोलिस, न्यायालये, बालकल्याण समित्या, आरोग्य व शिक्षण संस्था यांच्या सहकार्याने आयोग एक दृढ व सक्षम रचना निर्माण करत आहे, ज्यातून प्रत्येक बालकासाठी सुरक्षित आणि सन्मानपूर्वक वातावरण तयार होईल. आज जेव्हा संपूर्ण महाराष्ट्रात बालहक्कांची जाणीव वाढताना दिसते, तेव्हा ही सामाजिक जागृती म्हणजे आयोगाच्या कार्याचे फलित आहे, असे मला वाटते. बालकांना सुरक्षितता, विकासाची संधी आणि न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग सदैव तत्पर आहे आणि राहील, ही माझी खात्री आहे.

आपण सर्वांनी एकत्रितपणे हे सुनिश्चित करावे की आपल्या राज्यातील प्रत्येक बालकाचे बालपण आनंदी, सुरक्षित व सन्माननीय असेल कारण हीच आपल्या राष्ट्राची खरी उन्नती आहे.

अॅड. श्रीम. सुशीबेन शाह

Scanned with CamScanner

# आयोगाच्या कार्यालयातील प्रशासकीय संरचना मंजूर १२ पदे

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे |
|---|---|---|---|
| १ | सचिव | १ | १ |
| २ | विधी सल्लागार | १ | १ |
| ३ | प्रशासकीय अधिकारी | १ | ० |
| ४ | सहाय्यक प्रशासकीय अधिकारी तथा लेखा अधिकारी | १ | १ |
| ५ | उच्च श्रेणी लघुलेखक | २ | ० |
| ६ | परिविक्षा अधिकारी | २ | १ |
| ७ | लिपिक | २ | २ |
| ८ | शिपाई | २ | १ |

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| अ क्र | शीर्ष | पा. क्र. |
|---|---|---|
| १ | अ. लघुनामे / ब. आयोगाची स्थापना | १ ते ३ |
| २ | आयोगाची कार्ये | ६ |
| | १. राज्य बाल हक्क संरक्षण २००५ अधिनियमांतर्गत | ६ |
| | २. मोफत व सक्तीचा शिक्षण कायदा २००९ अंतर्गत | ९ |
| ३ | तक्रार निवारण यंत्रणा<br>१. अधिसूचना – १<br>२. अधिसूचना – २ | ११<br>११<br>१२ |
| ४ | तक्रार व तपासणी केलेल्या चौकशा व आयोगाचे दौरे व भेटी | १५ |
| ५ | आयोगाचे महत्त्वपूर्ण´ कामकाज | ३० |
| ६ | कार्यशाळा / चर्चासत्र / परिसंवाद / सार्वजनिक सुनावणी | ३८ |
| ७ | आयोगामार्फ त आयोजन करण्यात आलेले प्रशिक्षण शिबिर | ४९ |
| ८ | प्रकरणांचा गोषवारा | ५२ |
| ९ | लेखा अहवाल - २०२३-२०२४ | ५३ |


Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# लघुनामे

| | |
|---|---|
| ए डी जी पी | अतिरिक्त पोलीस महासंचालक (Additional Director General of Police) |
| सी सी आय | बालकांची देखभाल करणा-या संस्था (Childcare Institution) |
| सी सी एस ई | बालकांच्या लैंगिक शोषणाचा सामना करणे (Countering Child Sexual Exploitation) |
| सी डब्ल्यू सी | बाल कल्याण समिती (Child Welfare Committee) |
| सी डब्ल्यू पी ओ | बाल कल्याण पोलीस अधिकारी (Child Welfare Police Officer) |
| डी सी पी यु | जिल्हा बाल संरक्षण पथक (District Child Protection Unit) |
| डी ओ | जिल्हा अधिकारी (District Officer) |
| डी डब्ल्यू सी डी | महिला व बाल कल्याण विभाग (Department of Women and Child Development) |
| आय ए एस | भारतीय प्रशासकीय सेवा (Indian Administration Services) |
| आय सी एम ई सी | बेपत्ता आणि शोषित बालकांसाठी आंतरराष्ट्री केंद्र (International Centre for Missing and Exploited Children) |
| आय जी | महानिरीक्षक (Inspector General) |



Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| आय जे एम | आंतरराष्ट्रीय न्याय अभियान (International Justice Mission) |
| आय पी एस | भारतीय पोलीस सेवा (Indian Police Service) |
| जे जे अँक्ट | बाल न्याय अधिनियम २०१५ (Juvenile Justice Act, 2015) |
| जे जे बी | बाल न्याय मंडळ (Juvenile Justice Board) |
| एम ओ यु | सामंजस्य करार (Memorandum of Understanding) |
| एम एस सी पी सी आर | महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग (Maharashtra State Commission for Protection of Child Rights) |
| एन सी एम ई सी | बेपत्ता आणि शोषित बालकांसाठी राष्ट्रीय केंद्र (National Centre for Missing and Exploited Children) |
| एन सी पी सी आर | राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग (National Commission for Protection of Child Rights) |
| एन सी आर बी | राष्ट्रीय गुन्हे अभिलेख कार्यालय (National Crime Records Bureau) |
| पी पी पी | सार्वजनिक –खासगी भागीदार ( Public Private Partnership) |
| पी डब्ल्यू सी | प्राईसवाटर हाउस कुपर्स ( Pricewaterhouse Coopers ) |
| एस सी | सर्वाच्च न्यायालय (Supreme Court ) |
| एस आयआर | सामाजिक तपास अहवाल (Social Investigation Report) |
| एस जे पी यु | विशेष बाल पोलीस पथक ( Special Juvenile Police Unit ) |
| एस पी | पोलीस अधीक्षक ( Superintendent of Police) |



Scanned with CamScanner

# आयोगाची स्थापना

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना जुलै २००७ मध्ये एक वैधानिक संस्था म्हणून बाल हक्क संरक्षण अधिनियम २००५ (२००६ चा ४) च्या अंतर्गत राज्यातील बाल हक्कांचे संरक्षण, प्रोत्साहन आणि बचाव करण्यासाठी करण्यात आली. कायद्यात, बालक या शब्दाची व्याख्या अठरा वर्षांपेक्षा कमी वयाची व्यक्ती अशी केली गेली आहे. कायद्याच्या कलम २ (ब) नुसार बाल हक्क संदर्भातील संयुक्त राष्ट्र संघाच्या सभेतील स्वीकृत मुख्य मानकांमध्ये (CRC) अंतर्गत देण्यात आलेल्या खालील अधिकारांचा समावेश आहे. 'CRC' मध्ये बालकांसाठी विहित केलेली मुख्य मानके खालील प्रमाणे आहेत.

- वंश, रंग, लिंग, भाषा, धर्म, राजकीय किंवा अन्य मते, राष्ट्रीय वांशिक किंवा सामाजिक मूळ, मालमत्ता, अपंगत्व, जन्म किंवा बालकाची सामाजिक स्थिती आधारित सर्व प्रकारच्या भेदभावांपासून बालकास संरक्षण दिले जाते.
- बालकांशी संबंधित सर्व कृतींमध्ये बालकाचे हितसंबंध प्राथमिक ठरते.
- बालकाला ओळख, नाव आणि राष्ट्रीयत्व मिळण्याचा हक्क आहे.
- प्रत्येक बालकास जीवनाचा, जगण्याचा व विकासाचा जन्मतः हक्क असतो, ज्यात आरोग्याच्या उच्चतम साध्य दर्जापासून आजाराच्या उपचारांच्या सुविधांपर्यंत, शिक्षणाचा हक्क यांचा समावेश आहे, जे बालकाच्या व्यक्तिमत्वाच्या पूर्ण क्षमतेत विकास होण्यासाठी निर्देशित केले जाते; बालकांना आणि सामाजिक सुरक्षिततेचा लाभ घेण्याचा अधिकार आहे.



Scanned with CamScanner

- बालकास आराम व विश्रांती घेण्याचा, खेळ आणि करमणुकीच्या उपक्रमांमध्ये व्यस्त राहण्याचा हक्क आहे.
- प्रत्येक बालकास आदर्श मानसिक, आध्यात्मिक, नैतिक आणि सामाजिक विकासाचा हक्क आहे.
- कोणत्याही बालकाचे कोणत्याही हेतूने किंवा कोणत्याही स्वरूपात बेकायदेशीर हस्तांतरण, अपहरण, विक्री किंवा अनैतिक व्यापार होणार नाही.
- बालकांच्या मतांना योग्य महत्त्व देण्यात यावे.
- बालकाला पालकांच्या इच्छेविरुध्द त्यांच्यापासून विभक्त केले जाऊ शकत नाही. केवळ जर बालकाच्या हितासाठी असे वेगळे करणे आवश्यक असेल तर पालकांपासून विभक्त केले जाऊ शकते.
- कौटुंबिक वातावरणापासून वंचित असलेल्या बालकाला राज्याव्दारे प्रदान केलेले विशेष संरक्षण आणि सहाय्य मिळण्याचा अधिकार आहे.
- बालकांच्या संगोपनासाठी किंवा संरक्षणासाठी जबाबदार असणाऱ्या संस्था, सेवा आणि सुविधेच्या स्थापित केलेल्या विहीत मानकांचे पालन करतील.
- बालक आर्थिक शोषणापासून संरक्षित असावे.
- बालकांना मादक औषधे आणि मनावर दुष्परिणाम करणा-या पदार्थांचा अवैध वापर करण्यास अधीन केले जाऊ नये.
- मानसिक किंवा शारीरिकदृष्ट्या अपंग बालकाने संपूर्ण आणि परिपूर्ण आयुष्याचा आनंद घ्यावा, ज्यामुळे त्यांची प्रतिष्ठा सुनिश्चित होईल, आत्मनिर्भरता वाढेल आणि समाजात सक्रिय सहभागाची सुविधा मिळेल.
- लैंगिक शोषणासह सर्व प्रकारच्या शारीरिक व मानसिक हिंसाचार, दुखापत किंवा गैरवर्तन, दुर्लक्ष किंवा दुर्व्यवहार किंवा शोषण यापासून बालके सुरक्षित असावी,
- प्रत्येक बालक लैंगिक शोषण आणि लैंगिक शोषणाच्या सर्व प्रकारांपासून संरक्षित असले पाहिजे.



Scanned with CamScanner

- कोणत्याही बालकाला अत्याचार किंवा इतर क्रूर, अमानुष किंवा मानहानीकारक वागणूक वा शिक्षेअधीन केले जाऊ शकत नाही किंवा बेकायदेशीरपणे किंवा कोणत्याही प्रकारे त्याच्या स्वातंत्र्यापासून वंचित ठेवले जाऊ शकत नाही.

- कोणत्याही प्रकारची उपेक्षा, शोषण किंवा अत्याचार, अशा प्रकारच्या छळाला बळी पडलेल्या बालकाचे शारीरिक व मानसिक पुनर्वसन आणि स'माजात त्यांचे पुर्नएकिकरण प्रोत्साहित करण्यासाठी सर्व योग्य उपाययोजना केल्या जातील.

- सशस्त्र संघर्षातील, युध्दजन्य परिस्थितीमधील बालकांना लागू असलेल्या आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याच्या नियमांचा आदर केला जावा.

- दंडात्मक कायद्याचे उल्लंघन केल्याचा आरोप असलेल्या किंवा अशी ओळख असलेल्या प्रत्येक बालकास, सन्मान आणि योग्य वागणूक मिळण्याचा अधिकार आहे.

- कोणत्याही बालकावर (ज्याच्यावर आरोप लावला आहे किंवा आरोप सिद्ध झाला आहे अथवा ज्याने कायदा मोडला आहे) त्याच्या/तिच्या गोपनीयतेमध्ये, घरामध्ये किंवा बेकायदेशीर हस्तक्षेपापासून त्याच्या/तिच्या सन्मान आणि प्रतिष्ठेवर बाधा न घेऊ देणे.



Scanned with CamScanner

# आयोगाची कार्ये

## राज्य बाल हक्क संरक्षण कायदा २००५ अधिनियमांतर्गत

- बाल हक्कांच्या संरक्षणासाठी कोणत्याही कायद्याव्दारे किंवा त्या अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या संरक्षणाची तपासणी आणि आढावा घेणे आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपायांची शिफारस करणे;

- राज्य शासन त्या खबरदारीचे उपाय म्हणून आयोगास आवश्यकता भासल्यास कामाचा वार्षिक अथवा ठराविक नियतकालीक अहवाल सादर करणे;

- बालकांच्या अधिकाराचे उल्लंघन केल्याबद्दल चौकशी करणे आणि अशा प्रकरणांमध्ये कार्यवाहीची शिफारस करणे;

- दहशतवाद, जातीय हिंसाचार, दंगली, नैसर्गिक आपत्ती, घरगुती हिंसाचार, एचआयव्ही/एड्स, तस्करी, दुर्व्यवहार, छळ व शोषण, अश्लील साहित्य (Pornography) वेश्याव्यवसाय यांनी बाधित झालेल्या बालकांच्या हक्कांचा फायदा घेण्यास प्रतिबंध करणाऱ्या सर्व बाबींचे परीक्षण करणे आणि योग्य उपाययोजनांची शिफारस करणे;

- विशेष काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांशी संबंधित सर्व समस्यांकडे लक्ष देणे, ज्यात त्रस्त बालके, उपेक्षित आणि वंचित बालके, विधीसंघर्षग्रस्त बालके, अल्पवयीन बालके, कुटुंब नसलेली बालके आणि कैद्यांची बालके यांचा समावेश आहे व तसेच योग्य उपाययोजनांची शिफारस करणे;बालके याचा समावेश आहे व तसेच योग्य उपाययोजना ची शिफारस करणे;



Scanned with CamScanner

- बालकांच्या हक्कांबाबत संशोधन हाती घेणे आणि संशोधनास प्रोत्साहन देणे;
- समाजातील विविध घटकांमध्ये बाल हक्कांबाबत साक्षरता पसरवणे आणि प्रकाशने, माध्यमे, चर्चासत्रे आणि इतर उपलब्ध माध्यमांव्दारे या अधिकारांच्या संरक्षणासाठी उपलब्ध असलेल्या उपाययोजनांबाबत जागरुकता वाढविणे;
- राज्य सरकारच्या नियंत्रणाखालील सुधारगृह, किंवा बालकांसाठी असणारे कोणतेही निवासस्थान किंवा संस्था याची तपासणी करणे, सामाजिक संघटनांव्दारे चालविल्या जाणाऱ्या संस्थेसह इतर कोणतेही अधिकारी, जिथे बालकांना उपचार, सुधारणा किंवा संरक्षणाच्या उद्देशाने ताब्यात घेण्यात आले आहे किंवा त्यांना राहण्यासाठी ठिकाण दिली आहेत आणि आवश्यक वाटल्यास उपचारात्मक कार्यवाहीसाठी या अधिकाऱ्यांकडे नेणे;
- तक्रारींची चौकशी करणे किंवा खाली नमूद केलेल्या बाबींसंबंधित (SU-MOTO) स्वंयप्रेरणेने सूचना घेणे
  १. बालकांच्या अधिकाराचे उल्लंघन आणि वंचित ठेवणे;
  २. बालकांच्या संरक्षणासाठी आणि विकासासाठी प्रदान केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी न करणे.
  ३. बालकांचे त्रास कमी करण्याच्या आणि कल्याण सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने धोरणात्मक निर्णय, मार्गदर्शक तत्वे किंवा सूचनांचे पालन न करणे तसेच अशा बालकांना आराम प्रदान करणे किंवा अशा प्रकरणांमध्ये उद्भवणारे मुद्दे योग्य अधिकाऱ्याकडे उपस्थित करणे, आणि बालकाच्या हक्कांच्या वाढीसाठी अशी इतर आवश्यक कार्ये व वरील कार्यांमधील अनुषंगिक कोणतीही बाब.
- बालकाच्या हक्कांबाबत अधिवेशनाच्या अनुपालनाचे मूल्यांकन करण्यासाठी विद्यमान कायदा, धोरण आणि सराव यांचे विश्लेषण करणे, राज्य सरकारकडे दरवर्षी आणि आयोगाला योग्य वाटेल अशा इतर कालांतराने या सुरक्षा उपायांच्या कामकाजाचा अहवाल सादर करणे;काला तराने या सुरक्षा उपाया च्या कामकाजाचा अहवाल सादर करणे;



Scanned with CamScanner

- जेथे स्वतः बालकांव्दारे किंवा त्यांच्या वतीने संबंधित व्यक्तीव्दारे चिंता व्यक्त केली गेली असेल तेथे औपचारिक तपासणी करणे;

- बालकांच्या कामांमध्ये आणि बालकांशी संबंधित सर्व सरकारी विभाग / संस्था जे बालकांशी निगडित आहेत, त्यांना प्रोत्साहन देणे, त्यांचा आदर करणे आणि त्यांच्या दृष्टिकोनाचा गांभीर्यान विचार करणे.

- बाल हक्कांबद्दल माहिती सादरीकरण आणि प्रसार करणे;

- बालकांवरील माहिती संकलित करणे आणि विश्लेषण करणे;

- शालेय अभ्यासक्रमात बाल हक्कांच्या समावेशास प्रोत्साहित करणे, शिक्षकांचे प्रशिक्षण आणि बालकांशी संबंधित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे.



Scanned with CamScanner

# मोफत व सक्तीचा शिक्षण कायदा २००९ अंतर्गत

शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ च्या कलम ३१ आणि ३२ अंतर्गत बालहक्क संरक्षण आय़ोगाला पुढील कार्ये सोपविण्यात आली आहेत.

- या कायद्याव्दारे किंवा त्या अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या संरक्षणाची तपासणी करणे आणि आढावा घेणे (शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९) आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपायांची शिफारस करणे.
- बालकाच्या निःशुल्क आणि अनिवार्य शिक्षणा संबंधीच्या तक्रारींची चौकशी करणे.
- बाल हक्क कायदा २००५ च्या संरक्षणासाठी या आयोगाच्या कलम १५ आणि २४ नुसार आवश्यक ती कार्यवाही करणे.
- बाल हक्क कायदा आणि अनिवार्य शिक्षणाशी संबंधित कोणत्याही प्रकरणाची चौकशी करताना आयोगाच्या कलम १४ आणि २४ अंतर्गत बाल अधिकार अधिनियम २००५ च्या संरक्षणासाठी त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा समान अधिकार असेल.
- कलम ३१ मध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही गोष्टीचा प्रतिकार न करता, शिक्षण हक्क कायद्यांतर्गत बालकांच्या हक्काशी संबंधित कोणतीही तक्रार असल्यास, कुठलीही व्यक्ती कार्यक्षेत्रात असलेल्या स्थानिक प्राधिकरणाकडे लेखी तक्रार देऊ शकते.
- उपकलम ३२ (१) अंतर्गत तक्रार प्राप्त झाल्यानंतर स्थानिक प्राधिकरण या प्रकरणाचा निर्णय घेईल.
- स्थानिक प्राधिकरणाच्या निर्णयामुळे असंतुष्ट असलेली कोणतीही व्यक्ती राज्य आयोगाकडे अपील करण्यास प्राधान्य देऊ शकते. अधिनियम कलम ३२ (३) अन्वये, सदर प्राप्त अपिलावर राज्य आयोग निर्णय घेईल. बाल हक्कांसाठी राज्य आयोग ही एक वैधानिक संस्था आहे, जी बाल हक्क संरक्षण अधिनियम २००५ अंतर्गत गठित करण्यात आली आहे. राज्य सरकारने आदेश क्रमांक CRC./ २००६/CR.१३९/D-३/ दिनांक २४/७/२००७ अन्वये राज्य आयोगाची निर्मिती केली आहे.



Scanned with CamScanner

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क अधिनियम २००९ चे कलम ३१ अन्वये सदर अधिनियमांचे अंमलबजावणी ) Monitoring. देखरेख करण्याचे उत्तरदायित्व आयोगाकडे आहे (तसेच बाल हक्कांच्या संरक्षणाची जपणूकप्रचार व प्रसार हा आयोगाच्या स्थापनेच्या उद्देशांपैकी एक आहे).

१. शालेय शिक्षण विभागाचे दि. १०/३/२०२२ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व शाळांमध्ये मुलांमुलींच्या सुरक्षिततेसाठी व निकोप आणि समता मुलक वातावरण निर्मितीसाठी विविध स्तरावर सखी सावित्री समितीचे गठण करणे बाबत शासन आदेश आहे. मात्र राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये सदर समितीचे गठण झालेले नाही. तसेच शासन निर्णयाची प्रभावी अमंलबजावणी केली जात नसल्याचे दिसून येत असल्याने, बालकांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने सदर शासन निर्णयाची सक्तीने अमंलबजावणी करणे गरजेचे आहे.

२. सदर शासन निर्णयाचे प्रभावी अमंलबजावणीसाठी काही मार्गदर्शक सूचनांची आवश्यकता आहे. या अनुषंगाने आयोगाने काही मार्गदर्शक सूचनांचे प्रारूप तयार केले आहे



Scanned with CamScanner

# तक्रार निवारण यंत्रणा

## अधिसूचना १

- कलम १३ च्या उपकलम (१) जे आणि (१) जे (i) (ii) (iii) आणि कलम १३ चे उपकलम (१) के, उपकलमांसह, कलम १४ च्या कलम (१) अंतर्गत नमूद केलेल्या तरतूदींन्वये राज्य आयोगास दिलेल्या अधिकारानुसार, या तरतूदींच्या विचाराधीन प्रस्तावांच्या अंमल बजावणीसाठी कार्यपद्धती निश्चितीच्या प्रस्तावाला आयोगाने मान्यता दिली आहे, त्यानुसार खालीलप्रमाणे प्रक्रिया तयार केली आहे.
- बाल हक्क आयोग कायदा २००५ च्या कलम १३ चे उपकलम (J) (i) (ii) (iii) चे अनुसरण करण्यासाठी, माहिती आयोग आणि महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या धर्तीवर आयोगाच्या सदस्यांमध्ये खालील प्रमाणे कामांचे वाटप करण्यात आले आहे.
- अ-१) आयोगाचे मुख्य खंडपीठ मुंबई मध्ये असेल आणि औरंगाबाद व नागपूर येथे अनुक्रमे न्यायनिर्णय खंडपीठ असतील.
- अ-२) आयोगाच्या बाल हक्क संरक्षण अधिनियम २००५ उपकलमांतर्गत तक्रारी मुंबईत प्राप्त होतील आणि तक्रार मिळाल्यानंतर संबंधित खंडपीठांना द्यावी लागेल.
- त्यांच्या कार्यक्षेत्रात सुनावणी घेण्याच्या ठिकाणांमध्ये बदल संबंधित खंडपीठाच्या सदस्यांव्दारे निश्चित केला जाईल.
- सुनावणीसाठी कमीतकमी दोन सदस्यांची गणपूर्ती आवश्यक आहे.
- एका खंडपीठातून दुस-या खंडपीठात सदस्यांच्या बदलीचा निर्णय आयोगाच्या बैठकीत घेण्यात येईल.
- जर एखाद्या महत्त्वाच्या प्रकरणाचा सहभाग असेल तर ही बाब मुंबईत संपूर्ण आयोगाच्या सभागृहात ऐकली जाईल. प्रकरणाचे स्वरूप महत्वाचे आहे की नाही हे मा. अध्यक्ष किंवा सचिव (सदस्य, सचिव म्हणून संदर्भित) निर्णय घेतील. संपूर्ण सभागृह सुनावणी मुंबईत दरमहा किमान एकदा तरी होईल. संपूर्ण सभागृह सुनावणी आणि आयोगाची बैठक कदाचित त्याच दिवशी आयोजित केली जाईल.
- सदस्यांच्या कामाचा भार लक्षात घेऊन सभापती त्यांना एका खंडामधून (खंडपीठ) इतर खंडामध्ये सुनावणीसाठी पाठवू शकतात.



Scanned with CamScanner

# अधिसूचना २

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने राज्य शासनाच्या दिनांक २४/७/२००५ आदेशानुसार बाल हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या आयोगाला 'बाल हक्क संरक्षण आयोग' असे नामांकित केले आणि राज्य शासनाच्या वतीने दिनांक ३१/०५/२०१० रोजी नियम तयार केले.

# कार्यपद्धती

- कोणत्याही व्यक्तीस / प्राधिकरणास /संस्थेस राज्य व केंद्र शासन अथवा कोणतेही प्राधिकरण संस्था यांनी बालकांसंदर्भात केलेल्या निम्नलिखित कृती, अपकृतींबाबत स्वयं प्रेरणेने राज्य बाल हक्क आयोगाकडे दाद मागण्यासाठी अर्ज दाखल करता येईल.
- अ) बालकाच्या अधिकाराचा वंचितपणा आणि मानहानी
- ब) बालकांच्या संरक्षण आणि विकासासाठी प्रदान केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी न करणे.
- क) बालकांचे त्रास कमी करण्यासाठी धोरणात्मक निर्णय, मार्गदर्शक तत्वे किंवा निर्बंध यांचे पालन न करणे आणि त्यांचे कल्याण सुनिश्चित न करणे आणि अशा बालकांना दिलासा न देणे.
- ड) बालकाच्या अधिकारात किंवा इतर कोणत्याही गोष्टीच्या वाढीसाठी उपरोक्त कार्यात योगायोगाने आवश्यक वाटत असणारी इतर कार्ये.
- सर्व अर्ज, सचिव, महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण आयोग, तिसरा मजला जी. टी. एस. बिल्डिंग, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०००३० यांना संबोधित केले पाहिजे.
- प्रत्येक अर्जावर नाव, वर्णन, अर्जदार आणि प्रतिवादी यांच्या संपूर्ण पत्रव्यवहाराचा पत्ता निश्चित केला जाईल. हे फुलस्केप (विहीत आकाराचे कागद) कागदावर दुप्पट जागा सोडून टंकलिखित केले जावे आणि योग्य क्रमांकित परिच्छेदानुसार, सर्व वस्तुस्थिती कारणास्तव आणि सुटकेचा दावा केला गेला असेल ते कालक्रमानुसार पुढे मांडले जातील आणि अर्जदार किंवा त्याच्या वकीलाव्दारे स्वाक्षरी केली जाईल.
- अर्जाच्या सहा प्रती दाखल केल्या पुहिजेत आणि त्यासह अर्जाच्या बरोबर असलेल्या त्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत असतील, अर्जाच्या विधिवत साक्षांकित प्रतिज्ञापत्रानुसार ज्याचे समर्थन केले जाईल. अर्जाची सर्व पाने क्रमांकित केली जातील.



Scanned with CamScanner

- अर्जाची प्रत अर्जदार सर्व प्रतिवादींना पाठवेल आणि टपाल किंवा कुरिअरची पुराव्याची पावतीची छायाचित्र प्रत अर्जासोबत दाखल केली जाईल.

- प्रत्येक अर्जास घटनाक्रम (INDEX) असेल.

- अर्ज मिळाल्यानंतर वकीलामार्फत, केंद्र शासन, राज्य शासन, अन्य कोणताही अधिकार, इलेक्ट्रॉनिक माध्यम किंवा इतर कोणत्याही माध्य माध्यमातून पक्षकारांना सुनावणीची नोटीस पाठवण्यात येईल. नोटीसी मध्ये तारीख व आयोगासमोर सुनावणीचे ठिकाण कळविण्यात येईल.

- जेथे समान विषयाकरीता असे पुष्कळ अर्ज प्राप्त झाले आहेत ज्यात सार्वजनिक विषय एकच उपस्थित केला गेला आहे आणि तत्सम विषय मागितले गेले आहेत, आयोग पक्षकारांना वर्तमानपत्रात जाहिरातीव्दारे सार्वजनिक नोटीस बजावू शकतो. अशा प्रकरणांमध्ये अशा नोटीसच्या प्रकाशनाचा खर्च कोण उचलेल हे आयोग निश्चित करू शकेल.

- प्रतिवादीला (अर्जदाराच्या आगाऊ प्रती दिल्याचा पुरावा असलेले) प्रति-प्रतिज्ञापत्र (उत्तर) च्या स्वरूपात अर्जावर लेखी आक्षेप नोंदविण्यास स्वातंत्र्य असेल, प्रतिज्ञापत्रात परिच्छेदानुसार गुणवत्तेवर उत्तर दिले जाईल आणि कोणतीही सामान्य उत्तरे किंवा नकार विचारात धरले जाणार नाहीत. जर प्रतिवादी हे केंद्र शासन, राज्य शासन, शासकीय उपक्रम किंवा केंद्र / राज्य शासनाच्या मालकीचे, व्यवस्थापित किंवा नियंत्रित असलेल्या कोणत्याही प्राधिकरणाचे कार्यालय असेल तर अशा प्रति - प्रतिज्ञापत्रात, प्राधिकरण किंवा उपक्रम विभाग प्रमुखांच्या स्वाक्षरी असतील.

- **आयोगाला खालील अधिकार असतील** :-

अ) कोणत्याही व्यक्तीकडून किंवा केंद्र सरकारकडून किंवा राज्यातील किंवा अन्यअधिका-यांकडून कोणत्याही कागदपत्रे मागवणे.

ब) कोणत्याही व्यक्तीला साक्ष देण्याकरिता/पुरावा सादर करण्याकरिता हजर राहण्यासाठी फर्मावणे आणि अशा व्यक्तीकडून एकतर शपथेवर (प्रतिज्ञापत्रावर) किंवा अन्य पुरावे मिळवणे.

क) त्याच्या कार्या संदर्भात आवश्यक असलेल्या व्यक्तीची (अधिकारी) / अधिकाऱ्यांची उपस्थिती / मदत घेणे.



Scanned with CamScanner

- किमान दोन सदस्यांचा समावेश असलेली संस्था अर्ज ऐकण्यास आणि आदेश देण्यास सक्षम असेल.
- आयोग, आवश्यकतेनुसार, क्षेत्रीय भेटी घेईल, आयोगास योग्य वाटेल असे एक किंवा अधिक सदस्यांव्दारे किंवा विशेष आमंत्रित व्यक्तीसोबत किंवा केंद्र शासन, / राज्य शासनाचे अधिकारी, स्वयंसेवी संस्था, संस्था आणि तज्ञ यांच्यामार्फत अधिकारी आणि स्वयंसेवी संस्थासमवेत सार्वजनिक सुनावणी घेईल.
- अशा प्रकरणांमध्ये शक्य होईल असा अंतरिम आदेश आयोग देऊ शकेल; अंतरिम आदेश जारी झाल्यापासून शक्यतो ९० दिवसांच्या आत अंतिम आदेश देईल.
- पक्षकारांना सुनावणीची संधी दिल्यानंतर आयोग लेखी आदेश पाठवेल, त्याच्या प्रती संबंधित पक्षकारांना पाठवल्या जातील.
- समितीव्दारे पारित केलेले सर्व आदेश सचिवाव्दारे प्रमाणित केले जातील आणि त्यावर आयोगाचा शिक्का राहील.



Scanned with CamScanner

# तक्रारी व तपासणी केलेल्या चौकशी, आयोगाव्दारे घेण्यात आलेल्या सनावण्या व आयोगाव्दारे घेण्यात आलेल्या भेटी व दौरे




महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगा चा दि.१५ व १६ फेब्रुवारी २०२३ या दिवशी अहमदनगर येथे दौरा संपन्न झाला.

कोल्हापूर बार कौन्सिलला भेट दिली आणि "बालरक्षक" च्या आमच्या अनोख्या सहभागासाठी त्यांचा पाठिंबा मागितला, जो बालमित्र महाराष्ट्राचा च्या प्रकल्पाला बळ देईल





Scanned with CamScanner



सकाळी कोल्हापूर दौरा चे दुसऱ्या दिवशी सर्व WCD, जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, आरोग्य, पोलीस विभाग यांची एकत्रित बैठक घेऊन #CHILD FRIENDLY MAHARASHTRA साठी आवश्यक सूचना दिल्या व चर्चा केली.



कोल्हापूर येथील शासकीय सायबर कॉलेज येथील सामाजिक कार्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना संबोधित केले. तसेच राज्य बालहक्क आयोगाच्या बालरक्षक या उपक्रमाबाबत माहिती देऊन यात सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी कॉलेजचे प्राचार्य श्री. दिपक भोसले यांनी स्वागत केले.



Scanned with CamScanner



महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा दिनांक २८ व २९ मार्च २०२३ या दोन दिवशी कोल्हापूर येथे दौरा आयोजित करण्यात आलेला आहे..

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची अध्यक्षा म्हणून मी श्री. दिपक पांडे, विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला, अत्याचार, प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य यांची भेट घेतली





महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा अँड. श्रीम. सुशीबेन शहा यांनी CCDT आश्रय मुलांच्या निवारागृहाला भेट दिली



Scanned with CamScanner




मा. श्री दीपक केसरकर, मंत्री, शालेय शिक्षण यांच्या समवेत बैठक संपन्न झाली.  सदर बैठकीमध्ये खालील आयोगाच्या कामकाजा बाबत  चर्चा करण्यात आली.



महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगामार्फत आयोजित पोक्सो कायदा २०१२ व जे.जे. ॲक्ट २०१५ च्या परिणामकारक अंमलबजावणी बाबत आढावा घेण्यासंदर्भात आयोजित कार्यक्रमाची सुरुवात राज्य गीताने करण्यात आली.



Scanned with CamScanner



महाराष्ट्रातील बालकांना संरक्षण देणे आणि त्यांच्या हकांचे रक्षण करण्यासाठी तत्पर असलेल्या महाराष्ट्र बाल हक्क आयोगाच्या विविध कार्यक्रमांच्या परिणामकारक अंमलबजावणी बाबत आयोगाच्या सदस्यांसोबत पुढील कामकाजाचे नियोजन करण्यासंबंधी बैठक पार पडली.




महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या आढावा बैठकीची सुरुवात महाराष्ट्र गीताने करण्यात आली.



Scanned with CamScanner



मुंबई विमानतळाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि विमानतळावर प्रियदर्शिनी टॅक्सी सेवा पुन्हा सुरू करण्याबाबत चर्चा केली. विमानतळावर त्यांच्या उदरनिर्वाहावर परिणाम होत असलेल्या समस्यांबाबत चर्चा केली



मुंबई येथे महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाची बैठक पार पडली. मजलिस या स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधींसोबत पार पडलेल्या बैठकीत मुंबई आणि कोंकण विभागात #POCSO आणि #JUVENILE JUSTICE कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.



Scanned with CamScanner




आंतरराष्ट्रीय बालकामगार विरोधी दिना निमित्त बेहराम पाडा, वांद्रे येथे काढण्यात आलेल्या बाल कामगार विरोधी जनजागृती रैली मधे सहभागी होत सदर आशयाची पत्रके दुकानांमध्ये जाऊन वाटली व या मोहिमेचा प्रसार करणारी स्टिकर गाड्यांवर लावण्यात आले




कामगार आयुक्तालय, कामगार भवन येथे आंतरराष्ट्रीय बालकामगार विरोधी दिनानिमित्त जनजागृती करण्यासाठी स्वाक्षरी मोहीमची सुरुवात करण्यात आली. उपस्थित सर्वांनी बालकामगार विरोधी मोहिमेत फलकावर स्वाक्षरी केली.



Scanned with CamScanner




राजस्थान राज्य बाल अधिकार संरक्षण आयोगामार्फत माऊंटअबू येथे आयोजित राष्ट्रीय परिसंवाद कार्यक्रमांतर्गत डिजिटल स्पेसमध्ये बाल हक्कांना सुरक्षित करण्याबाबत झालेल्या चर्चा सत्रात महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा व सदस्य सहभागी झालेत.




नांदेड येथील नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालयात आयोजित केलेल्या लैंगिक शोषण संवेदन कार्यक्रमास आयोगाच्या अध्यक्षा, अँड. श्रीम. सुशीबेन शाह यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते.



Scanned with CamScanner




महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगामार्फत 'पोक्सो' व बाल न्याय अधिनियम कायद्यांतर्गत दाखल प्रकरणांचा आढावा घेण्यासाठी औरंगाबाद विभागात जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



मा. ना. अदिती तटकरे , मंत्री महिला व बाल विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई शहर व उपनगर परिसरात सार्वजनिक खाजगी स्वरुपात डे केअर सेंटर सुरु करण्याबाबत आयोजित बैठकीत महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या वतीने उपरोक्त विषयावर चर्चा करण्यात आली.



Scanned with CamScanner



मुंबई उच्च न्यायालया द्वारे आयोजित आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या बाल हक्क समिती, महाराष्ट्र न्यायिक अकादमीच्या महिला व बाल विकास विभाग यांनी आयोजित केलेल्या चर्चासत्रात विविध मान्यवरांसह प्रमुख उपस्थिती म्हणून सहभाग घेतला



महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या वतीने रायगड जिल्ह्यातील इर्शाळवाडी येथील दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेमध्ये बाधित कुटुंबातील अनाथ बालक व त्यांच्या नातेवाईक यांची भेट घेऊन सदर दुर्घटनेमध्ये शून्य ते अठरा वयोगटातील अनाथ झालेल्या 22 बालकांना संरक्षण देण्यासाठी विशेष बाब म्हणून महिला व बालविकास विभागाची बालसंगोपन योजना लागू करण्याबाबत बाबत आयोगामार्फत पाठपुरावा करण्यात आला.



Scanned with CamScanner



महत्त्वाच्या विषयांवर बाल हक्क संरक्षण आयोगाच्या कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. राज्यातील बालकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी बाल हक्क संरक्षण आयोग कटिबध्द आहे. त्याच अनुषंगाने येणाऱ्या काळात या विषयीच्या योजना आखण्याबाबत चर्चा करण्यात आली




महिला आणि बालविकास खात्याच्या मंत्री सन्माननीय अदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या झूम मीटिंग मध्ये महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या वतीने उपस्थित राहून विविध विषयांवर व बाल दिनी देण्यात येणाऱ्या पुरस्काराच्या बाबतीत चर्चा करण्यात आली



Scanned with CamScanner




महाराष्ट्र राज्याचे शिक्षण आयुक्त श्री. सुरज मांढरे यांची भेट घेऊन ECE मार्गदर्शक तत्वे तयार करताना बाल हक्क आयोग व या क्षेत्रात काम करणाऱ्या काही संस्थाचा समावेश करावा, RTE ॲक्ट ची अंमलबजावणीसाठी येणाऱ्या अडचणी, खाजगी शाळेत फी न भरल्यामुळे विद्यार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दाखला अडवून ठेवणे यासंबंधी योग्य ते पाऊल उचलण्या संबंधी चर्चा केली



बाल हक्क आयोगाच्या पुणे येथील सुनावणी वेळेस प्रलंबित पोद्दार इंटरनॅशनल शाळेसंबंधी प्रकरणात संबंधित पालकांना शाळेच्या मुख्याध्यापकांना व शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलवून बैठक घेतली



Scanned with CamScanner



महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोगाद्वारे पुणे येथील महात्मा गांधी प्रशिक्षण केंद्र, महिला व बाल विकास कार्यालय येथे आयोगाच्या सदस्यांसोबत पुणे विभागाच्या प्रलंबित प्रकरणांची सुनावणी आयोजित करण्यात आली




नांदेड आणि महाराष्ट्रातील इतर भागांतील रुग्णालयात घडलेल्या दुर्दैवी मृत्यूंच्या पार्श्वभूमीवर आज मुंबईत बालकांचे वाडिया हॉस्पिटल येथे बालहक्क आयोग सचिव श्री. शिवराज पाटील (भा. प्र. से.) यांच्यासोबत भेट देऊन पाहणी केली



Scanned with CamScanner



रस्त्यावरील मुलांसाठी कार्य करणाऱ्या सलाम बालक ट्रस्ट च्या संस्थापक झरीन गुप्ता यांनी आयोगाच्या अध्यक्षा, अँड. श्रीम. सुशीबेन शाह यांची भेट घेऊन मुंबई मधील रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी व सुरक्षितेसाठी चर्चा केली.



मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृहात महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महिला व बाल विकास विभाग, UNICEF INDIA यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बाल स्नेही पुरस्कार २०२३ पार पडला. यावेळेस प्रमुख उपस्थिती म्हणून महिला व बाल विकास मंत्री मा. ना. अदिति तटकरे, विरोधी पक्षनेता मा. श्री. विजय वडेट्टीवार, महिला व बाल विकास आयुक्त डॉ. श्री. प्रशांत नारनवरे, विशेष पोलीस महानिरीक्षक (महिला व अत्याचार) श्री. दीपक पांडे, बचपन बचाओ आंदोलनाच्या संचालिका संपूर्ण बेहरुआ हजर होते. बालकांच्या संरक्षणासाठी विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींना सदर पुरस्कार प्रदान करण्यात आले.



Scanned with CamScanner



**शालेय शिक्षण विभाग मंत्री मा. ना. श्री. दिपक केसरकर यांच्या सोबत बैठक संपन्न झाली. अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. सदर बैठकीत राज्यातील सर्व शाळांतील मुला मुलींच्या सुरक्षितेसाठी वातावरण निर्मितीसाठी सखी सावित्री समिती गठण करणे बाबत चर्चा झाली. तसेच चिराग ॲप चा प्रचार प्रसार करण्यासाठी जनजागृती करण्यासंबंधी सूचना मंत्री महोदय यांनी संबंधितांना दिल्या.**

नागपूर दौऱ्याच्या अनुषंगाने काटोल रोड, नागपूर येथील मुलींच्या शासकीय बालगृहात भेट दिली, या वसतिगृहात मुलींच्या सर्वांगीण विकासाकरिता राबविण्यात येणारे उपक्रम आणि गतिमंद मुलींची घेण्यात येणारी काळजी निश्चितच उल्लेखनीय आहे. माझ्या सदर संस्थेला पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा






बाल हक्क संरक्षण आयोगाच्या वतीने नाशिक येथील पोक्सो व बाल न्याय अधिनियम (जे.जे. ॲक्ट) कायद्याअंतर्गत नाशिक विभागातील प्रकरणांबाबत पुनरावलोकन बैठक आयोजित केली होती.



Scanned with CamScanner

# आयोगाचे महत्त्वपूर्ण कामकाज

आयोगाने आपली कार्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडताना सक्रिय भूमिका बजावली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. सखी सावित्री समितीचे गठण :-

- याबाबत दि. १०.०३.२०२२ रोजीच्या शासन निर्णयाची प्रभावी अमंलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांचेकडून प्रस्तावित मार्गदर्शक सूचना :-
- जागरूकता आणि कौशल्य निर्माण

२. सर्व समिती सदस्यांना ज्ञान, कौशल्य आणि मानसिकतेचे प्रशिक्षण

३. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना बाल सुरक्षा, बाल विकास (भावनिक, शारिरीक, सामाजिक, लैंगिक आणि दुर्लक्षित) तसेच एखादया विद्यार्थ्यांने त्यांच्यावर होत असलेल्या शोषणाची माहिती दिली तर सदर परिस्थीत हाताळण्याचे प्रशिक्षण त्यांना देण्यात यावे. सदर प्रशिक्षण शासनाच्या विविध विभागातर्फ (DIET, जिल्हा शिक्षण विभाग, SCERT) आणि स्वयंसेवी संस्था यांच्या समर्थनाव्दारे ऑनलाईन किंवा ऑफलाईन प्रशिक्षण आयोजित करून ज्ञान, कौशल्य तसेच मानसिकता घडवणे.

४. शाळेतील प्रार्थनेच्या वेळी, जेवणाच्या सुट्टीत पोस्टर, ऑडिओ-व्हिज्युअल, शपथ, व्हिडिओ आणि घोषणाव्दारे बाल सुरक्षा, बाल हक्क, चाईल्ड हेल्पलाईन नंबर आणि जवळच्या पोलीस स्टेशन नंबरबद्दल जागरूकता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

५. स्वसंरक्षण अभ्यासक्रम तसेच प्रशिक्षण फक्त मुलींसाठीच नव्हे तर मुलांसाठीही आयोजित केला पाहिजे.

६. महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने तयार केलेले विविध पोस्टर शाळेचे कँटीन, स्वच्छतागृहे यांचेजवळ लावावे.

- अहवाल आणि देखरेख प्रक्रिया

१. समिती सदस्यांना प्रकरणांचा अहवाल देण्याबाबत स्पष्टता तेच तक्रार चिराग अँप वर ही दाखल करता येतात याबाबत मुलांना जनजागृती करणे..



Scanned with CamScanner

१. पीडित बालक तसेच त्याचे मित्र-मैत्रिणी यांच्याकडून प्रकरणाबाबत माहिती दिल्यानंतर समिती सदस्यांनी प्रकरण हाताळताना उचलावयाचे स्पष्ट पाऊल. (सदर प्रकरणाला प्रतिसाद देण्यासाठी कालावधी + हस्तक्षेप योजना तयार करणे + विद्यार्थ्यास योग्य त्या संसाधनांचा पुरवठा करून त्यांना सुरक्षित वाटत असल्याची खात्री करणे व त्यानतंर समिती आपला हस्तक्षेप बंद करणे) प्रकरणे निकाली काढताना सरकारी कायद्यांचे पालन केले जाईल याची समिती खात्री करेल, उदाहरणार्थ, जे जे कायदा, पोक्सो इ.

२. शाळेच्या मुख्याध्यापकांव्दारे SARAL पोर्टलव्दारे प्रकरणांची नोंद करणे तपशीलवार अहवालासाठी एक वेगळा टॅब SARAL पोर्टलवर तयार करणे जेणेकरून मुलाला इतर कोणत्याही शाळेत हस्तांतरित केल्यास, शाळेच्या मुख्याध्यापकास त्याबाबतची माहिती मिळेल आणि त्यानुसार मुख्याध्यापक विदयार्थ्याला मदत देतील. शाळेच्या अखत्यारीत येत नसलेल्या प्रकरणांसाठी प्रकरणाचा तपशील CHIRAG ॲप (MSCPCR) चा वापर करण्यात येईल.

३. शहर / तालुका जिल्हास्तरिय समित्यांना बाल संरक्षण प्रकरणांच्या डॅशबोर्डवर प्रवेश असेल जेणेकरून ते त्यानुसार शाळा + वार्त्यांना मदत करतील व भविष्याकरिता प्रशिक्षणाचे नियोंजन करतील.

४. अहवाल सादर करणे शाळांनी गटशिक्षणाधिकारी/प्रशासनअधिकारी ला अहवाल सादर करणे आवश्यक आहे. एकत्रित प्रभाग अहवाल गटशिक्षणाधिकारी / प्रशासनअधिकारीव्दारे जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे सादर करणे आवश्यक आहे. जिल्हा शिक्षणाधिकारी त्रैमासिक अहवाल तसेच या अनुषंगाने शाळेमध्ये केलेल्या तपासणी याबाबतचा सर्वंकष अहवाल आयोगाकडे सादर करतील.

५. सखी सावित्री या शासन निर्णयामधील नाव बदलून लिंग समानतेच्या उद्देशाने समितीचा "**ज्योतिबा- सावित्री**" असा उल्लेख करण्यात यावा.

६. समुपदेशकांची नियुक्ती प्रत्येक शाळेमध्ये एक समुपदेशक असणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांना मानसिक तंदुरूस्तीच्या आधाराची आवश्यकता आहे अश्या विद्यार्थ्यांते समुपदेशन करणे व त्यांना प्रवाहात आणणे हे उद्दिष्ट साध्य करता येईल.

- **सार्वजनिक-खाजगी भागीदारी**

१. शाळा + URC + शहर स्तरावर स्थापन केलेल्या समित्यांमध्ये NGO सदस्यांचे प्रतिनिधित्व करणे. 2. शिक्षक + समिती सदस्य शिक्षिकेतर कर्मचारी यांच्यासाठी ऑनलाईन प्रशिक्षणासाठी विदयमान डिजिटल प्लॅटफार्म वापरणे. तसेच, जेथे ऑफलाइन प्रशिक्षण आवश्यक असेल तेथे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि समिती सदस्यांसाठी ऑफलाइन प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांकडून मदत घेता येईल.



Scanned with CamScanner



दि.०९.०५.२०२३ रोजी सखी सावित्री तसेच शिक्षण विभागातील अन्य विषयावर चर्चा करणेसाठी मा. श्री. दीपक केसरकर, शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेसमवेत मंत्रालयात बैठक संपन्न झाली. शालेय शिक्षण विभागाचे दि.१०.०३.२०२२ रोजीचा शासन निर्णयान्वये, "शाळा स्तरावर राज्यातील सर्व शाळांमध्ये मुला-मुलींच्या सुरक्षिततेसाठी व निकोप आणि समतामुलक वातावरण निर्मितीसाठी विविध स्तरावर सखी सावित्री गठन करणेबाबत " शासन आदेश आहे. सदर शासन निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आयोगाने मार्गदर्शक सुचनांचे प्रारूप शासनाला सादर केले.



शालेय शिक्षण विभागाचे दि.१०.०३.२०२२ रोजीचा शासन निर्णयान्वये, " शाळा स्तरावर राज्यातील सर्व शाळांमध्ये मुला-मुलींच्या सुरक्षिततेसाठी व निकोप आणि समतामुलक वातावरण निर्मितीसाठी विविध स्तरावर सखी सावित्री गठन करणेबाबत " शासन आदेश आहे.



Scanned with CamScanner

या अनुषंगाने मंत्री महोद्य यांनी राज्यातील सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षण संचालक प्राथमिक शिक्षण संचालक माध्यमिक व इतर वरिष्ठ अधिकारी यांची ऑनलाईन बैठक दि.०३.११.२०२३ रोजी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई येथे आयोजित केली होती. सदर बैठकीत मंत्री यांनी सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांना शासन निर्णयाची तातडीने कालबध्द नियोजन करून अंमलबजावणी करण्याच्या सुचना दिल्या. सदर बैठकीस आयोगाच्या वतीने अँड, सुशीबेन शाह, अध्यक्षा, अँड. निलिमा चव्हाण, सदस्या, श्रीम. रोहिणी लाडे, प्रभारी प्रशासकीय अधिकारी तथा लेखाधिकारी, श्रीम. माधवी भोसले, अधीक्षक (म.शि.से), श्री. अजय लोंढे, कनिष्ठ काळजी वाहक हे उपस्थित होते..

## आयोगामार्फत तयार करण्यात आलेले नियामक मार्गदर्शक तत्वे



**राज्याचे शालेय शिक्षण विभागामार्फत संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे तसेच** आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या अध्यक्ष व मार्गदर्शनाखाली स्थापित कमिटीद्वारे राज्यातील बाल्य अवस्था पूर्व संगोपन शिक्षण / पूर्व प्राथमिक केंद्र यांचे करिता नियमक मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात येत आहेत. या अनुषंगाने या क्षेत्रातील अनेक तज्ञ व्यक्ती यांच्या समवेत आयोगाने नवीन शैक्षणिक धोरणास अनुसरून बाल्यावस्था पूर्व संगोपन शिक्षण / पूर्व प्राथमिक केंद्र यांचे करता नियमक मार्गदर्शक तत्वे तयार केलेली असून, ती शालेय शिक्षण विभागास दि. ३१/५/२०२३ रोजीचे पत्रांव्दारे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पाठवण्यात आलेली आहेत. सदर मार्गदर्शक तत्वे तयार करण्यासाठी आयोगाला युनिसेफ तसेच EARLY CHILDHOOD DEVELOPMENT (ECD) ALLIANCE अंतर्गत या क्षेत्रात कार्यरत अनेक संस्थानी सहकार्य केले.



Scanned with CamScanner

# बालस्नेही पुरस्कार २०२३

दिनांक - २२/११/२०२३

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, युनिसेफ महिला व बाल विकास विभाग, (कम्युटेड कम्युनिटीज डेव्हलपमेंट ट्रस्ट) CCDT (होप फोर चिल्ड्रन इंडिया पुणे, यांचे संयुक्त विदयमाने दि. २२/११/२०२३ रोजी "बाल स्नेही" राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे राज्यात प्रथमच आयोजन करण्यात आले. हा राज्यस्तरीय कार्यक्रम मुंबई येथे यशवंतराव चव्हाण सभागृह, नरीमन पॉइंट, मुंबई येथे सकाळी १०.३० ते १.३० या कालावधीत संपन्न झाला.

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग हा बाल हक्क संरक्षण अधिनियम, २००५ अंतर्गत स्थापित राज्यस्तरीय आयोग आहे. बाल हक्कांचे संरक्षण, त्याचा प्रचार व प्रसार करणे हे आयोगाच्या स्थापनेच्या प्रमुख उद्देशांपैकी एक आहे. बाल हक्कांचे संरक्षण व त्यांची सुरक्षा या महत्वपूर्ण विषयावर राज्यातील अनेक जिल्हाधिकारी कार्यालय, आरोग्य / शिक्षण विभाग, जिल्हापरिषद, मुख्य कार्यकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बाल कल्याण समित्या, बालगृह, पोलीस पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी, इ. प्रशासकीय यंत्रणा व संस्था या सकारात्मक पध्दतीने मोलाचे कार्य पार पाडत आहेत. अशा बाल स्नेही यंत्रणाना / व्यक्तीना बाल स्नेही" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगामार्फत कोकण पुणे व औरंगाबाद या विभागाचे, पोक्सो कायदा २०१२ व जे. जे. ॲक्ट अंतर्गत प्रकरणांचे पुनरावलोकन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्या दरम्यान आयोगामार्फत पोक्सो जे. जे. ॲक्ट व मनोधैर्य योजनेअंतर्गत माहिती पर पुस्तिकांचे अनावरण करण्यात आले.

या पुरस्कार सोहळ्यात महिला व बाल विकास मंत्री, आदिती तटकरे, विरोधी पक्ष नेते, मा. श्री. विजय वडेटीवार, मा.श्री. दीपक पांडे, पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग, मा. डॉ. प्रशांत नारनवरे, आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, श्रीम. संपूर्ण बेहुरा, कार्यकारी संचालिका, बचपन बचाव आंदोलन, आयोगाचे वतीने ॲड, सुशीबेन शाह, अध्यक्षा व इतर सर्व सदस्य, श्री. कॅरोलिन, होप फॉर चिल्ड्रन संस्थेच्या संचालिका, श्रीम. राजलक्ष्मी नायर, युनिसेफ, तसेच महिला व बाल विकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.



Scanned with CamScanner

| अ.क्र. | पुरस्कार विजेत्यांची वर्गवार | पुरस्कार विजेते |
|---|---|---|
| १ | उत्कृष्ट जिल्हाधिकारी | श्री.राहुल रेखावार, (जिल्हाधिकारी, कोल्हापूर) |
| | | श्रीम. आंचल गोयल, (जिल्हाधिकारी परभणी येथील कामकाजासाठी) |
| | | श्री.जलज शर्मा (जिल्हाधिकारी धुळे येथील कामकाजासाठी) |
| | | श्री. राजीव निवतकर (जिल्हाधिकारी मुंबई शहर येथील कामकाजासाठी) |
| २ | उत्कृष्ट जिल्हा पोलीस अधीक्षक | श्रीम.रागसुधा आर. (जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी) |
| ३ | उत्कृष्ट मुख्य कार्यकारी अधिकारी | श्रीम. भुवनेश्वरी (धुळे येथील कामकाजासाठी) |
| | | श्रीम. अशीमा मित्तल (नाशिक) |
| | | श्री. विवेक जॉन्सन (चंद्रपूर) |
| | | श्री. आयुष प्रसाद (पुणे येथील कामकाजासाठी) |
| ४ | उत्कृष्ट जिल्हा महिला बाल विकास अधिकारी | १. अकोला<br>२. धुळे<br>३. नाशिक(बाल कल्याण समितीसह<br>४. परभणी<br>५. कोल्हापूर (बाल कल्याण समितीसह)<br>६. ठाणे |
| ५ | उत्कृष्ट बाल कल्याण समिती | १. मुंबई उपनगर<br>२. नागपूर<br>३. जालना<br>४. अमरावती |
| ६ | उत्कृष्ट जिल्हा बाल संरक्षण पथक | १. यवतमाळ<br>२. मुंबई शहर<br>३. छत्रपती संभाजी नगर |



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ७ | उत्कृष्ट विशेष दत्तक संस्था | १. बाल आशा ट्रस्ट, मुंबई शहर<br>२. भारतीय समाजसेवा केंद्र, पुणे |
| ८ | उत्कृष्ट विशेष बालगृह | १. तुळजी प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था, मुलींचे विशेष बालगृह, धाराशील<br>२. अपंग मुलांचे शासकीय बालगृह, उल्हासनगर, जिल्हा ठाणे |
| ९ | उत्कृष्ट निरीक्षणगृह | १. डोंगरी निरीक्षणगृह, मुंबई शहर<br>२. भिवंडी निरीक्षणगृह, ठाणे |
| १० | उत्कृष्ट विशेष बालगृह | १. डोंगरी बालगृह, मुंबई शगर<br>२. सासकीय मुंलींचे बालगृह, नागपूर |
| ११ | उत्कृष्ट खुले निवारागृह | १. वात्सल्य फाऊंडेशन, महालक्ष्मी, मुंबई शहर<br>२. साथी (सोसायटी फाँर असींस्टन्स टू चिल्ड्रन इन डिफीकल्ट सिच्युएशन, पुणे) |

सदर कार्यक्रमामध्ये राज्यातील विविध बालगृहांमध्ये वास्तव्य करून शिक्षण घेतलेले व सदयस्थितीत विविध क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत असलेल्या एकूण ७५ तरूण, तरूणींचा सत्कार सोहळा संपन्न झाला.



Scanned with CamScanner

V) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार समिती गठित करून अहवाल शासनास सादर :-

संपूर्ण बेहुरा विरुद्ध युनियन ऑफ इंडिया या प्रकरणा मध्ये मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सर्व राज्यातील बाल हक्क संरक्षण आयोग यांना बाल न्याय अधिनियम (काळजी व संरक्षण) अंतर्गत विविध मुद्द्यांबाबत आणि सदर अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी परीविक्षा अधिकारी या पदांची संख्या किती आवश्यक आहे, याबाबत अभ्यास करून शासनास अहवाल सादर करणे बाबत निर्देश दिले होते, त्यानुसार आयोगाने आय. जे. एम. आणि टाटा इन्स्टिटट्यूट ऑफ सोशल सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने मा. श्री. एम. कानडे, मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृती न्यायाधीश, यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार समिती गठीत करून "राज्यातील जे. जे. ॲक्ट अंतर्गत बालगृहांमधील कार्यपद्धती आणि जे. जे. ॲक्टची प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या परीविक्षा अधिकारी यांच्या संख्येबाबतच्या विषयावरती अभ्यास पूर्ण करून या बाबतचा सविस्तर अहवाल महाराष्ट्र शासनास दि. ९/१०/२०२३ रोजी सादर केलेला आहे.



Scanned with CamScanner

# कार्यशाळा / चर्चासत्र / परिसंवाद






आयोगाने जेजे मॉडेल नियम २०१६ च्या नियम ९१ (1) (III) आणि महाराष्ट्र राज्याचे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम ९४ (III) मधील तरतुदींनुसार तसेच बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या तरतूदीनुसार मुलांच्या सुधारणेसाठी आणि पुनर्वसनासाठी प्रोटोकॉल विकसित करण्याचे काम सुरू केले आहे.



Scanned with CamScanner

या संदर्भात दि. २८/३/२०२२ रोजी एक बैठक आयोजित करण्यात आली होती. प्रेरणा या स्वंयसेवी संस्थेसमवेत बाल कल्याण क्षेत्र आणि राजमाता जिजाऊ मिशन बाल कल्याणाच्या विविध पैलूंसह काम करणाऱ्या अशा सर्व स्वयंसेवी संस्थांचा सहभाग होता. उदा. UNICEF, सलाम बालक ट्रस्ट, SUPPORT - अंमली पदार्थांच्या सेवनाने बळी पडलेल्या मुलांसाठी काम करणे, ASHIYANA, PRATHAM - बाल कामगारांसाठी काम करणे, या प्रोटोकॉलच्या विकासाच्या प्रक्रियेत आवश्यक होते. त्यानुसार या संस्थांना विषयपत्रिकेवर आपली इच्छा व निविष्ठा सादर करण्यास सांगण्यात आले. त्यापैकी अनेकांनी सकारात्मक माहिती दिली आहे. महिला व बाल कल्याण आयुक्तालय, पुणे यांच्याकडील विषयावरील सध्याची मार्गदर्शक तत्वे, परिपत्रके, अधिसूचना, जारी करण्यात आलेल्या निर्देशांच्या प्रती मागविण्याचा ठराव ही या बैठकीत करण्यात आला. त्यानुसार ही माहिती मागवली जाते. उपरोक्त सर्व संस्थांकडून अशी माहिती आणि निविष्ठा मिळाल्यानंतर, नमूद प्रोटोकॉल विकसित करण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण केले जाईल.

मुंबई उच्च न्यायालयाच्या बाल न्याय समिती, महाराष्ट्र न्यायिक अकादमी, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन आणि युनिसेफ यांनी बाल हक्क संरक्षणासाठी आयोजित केलेले चर्चासत्र :-

दि. ०६ ऑगस्ट, २०२३ रोजी मुंबई उच्च न्यायालया द्वारे आयोजित आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या बाल न्याय समिती, महाराष्ट्र न्यायिक अकादमी, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन आणि युनिसेफ यांनी आयोजित केलेल्या चर्चासत्रात विविध मान्यवरांसह आयोगाच्यावतीने अँड. सुशीबेन शाह, अध्यक्षा, अँड. निलिमा चव्हाण, सदस्या यांनी सदर कार्यक्रमात सहभाग घेतला. यावेळी अंमली पदार्थांमुळे वाढते गुन्हे लक्षात घेता मादक मेडिसिनची विक्री करताना खरेदी करणाऱ्याचा ओळखीचा पुरावा घेतला पाहिजे, असे मा. अध्यक्षा यांनी नमूद केले.

मुलांना चांगलं वातावरण दिले गेले पाहिजे. बालकांसाठी आश्वासक आणि निर्भय महाराष्ट्र बनविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत अशा विविध विषयांवर बाल हक्क संरक्षणासाठी जबाबदार प्रतिनिधींच्या वार्षिक चर्चा सत्रात चर्चा करण्यात आली.



Scanned with CamScanner



## मुंबई शहर व उपनगर परिसरात सार्वजनिक खाजगी स्वरुपात डे केअर सेंटर सुरु करण्याबाबत बैठक :-

दि. १० ऑगस्ट, २०२३ रोजी मा. ना. अदिती तटकरे, मंत्री महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई शहर व उपनगर परिसरात सार्वजनिक खाजगी स्वरुपात डे केअर सेंटर सुरु करण्याबाबत बैठकी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस आयोगाच्यावतीने अॅड. सुशीबेन शाह, अध्यक्षा, श्रीम. माधवी भोसले, अधीक्षक, महाराष्ट्र शिक्षण सेवा, या उपस्थित होत्या. सदर बैठकीस मा. श्रीम. रुबल अग्रवाल, आयुक्त, एकात्मिक बाल विकास प्रकल्प, श्री. तडवी, शिक्षणाधिकारी मुंबई महानगरपालिका तसेच या क्षेत्रात कार्यरत अनेक स्वंयसेवी संस्थाच्या प्रतिनिधी उपस्थित होते.





Scanned with CamScanner






दि. २२ ऑगस्ट, २०२३ रोजी नांदेड येथील नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालयामार्फत आयोजित केलेल्या लैंगिक 'GENDER SENSITISATION' कार्यक्रमासाठी आयोगाच्या अँड. सुशीबेन शाह, अध्यक्षा, यांनां प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते.

''RETHINKING THE AGE OF VICTIMS UNDER POCSO ACT' या विषयावर त्यांनी त्यांचे विचार व्यक्त केले तसेच भावी वकिलांना आवाहन केले की, त्यांनी पोक्सो आणि बाल न्याय कायद्यातील बारकावे समजून घेण्याचा प्रयत्न करावा आणि भविष्यातील मुलांवर त्याचा परिणाम समजून घ्यावा.





Scanned with CamScanner



दि. २४ ऑगस्ट, २०२३ रोजी महिला व बाल विकास विभागाच्या विविध विषयासंदर्भात मा. ना. अजित पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली वित्त विभागाची बैठक मंत्रालय येथे आयोजित करण्यात आली होती.

बालस्नेही महाराष्ट्र घडवण्यासाठी सर्व सहकार्य केले जाईल अशी हमी मा. उपमुख्यमंत्री यांनी सदर बैठकी दरम्यान दिली. तसेच आयोगातील रिक्त पदे आवश्यक अनुदान या अनुषंगाने कार्यवाहीबाबत संबंधितांना निर्देश दिले.

महाराष्ट्र राज्याचे शिक्षण आयुक्त श्री. सुरज मांढरे (भा.प्र.से) यांचे समवेत दि.११.१०.२०२३ रोजी शिक्षण आयुक्त कार्यालय




पुणे यांच्या कार्यलयात बैठक घेण्यात आली सदर बैठकीस आयोगाचे अध्यक्षा मा. सुशीबेन शहा, ॲड. जयश्री पालवे, सदस्या, श्री. चैतन्य पुरंदरे, सदस्य, श्री. प्रमोद बाडगी, विधी सल्लागार, श्रीम. माधवी भोसले, अधीक्षक, महाराष्ट्र शिक्षण सेवा, यांची भेट घेऊन ECE मार्गदर्शक तत्वे तयार करताना बाल हक्क आयोग व या क्षेत्रात काम करणाऱ्या काही संस्थाचा समावेश करावा, RTE ॲक्ट ची अंमलबजावणीसाठी येणाऱ्या अडचणी, खाजगी शाळेत फी न भरल्यामुळे विद्यार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दाखला अडवून ठेवणे यासंबंधी योग्य ते पाऊल उचलण्या संबंधीही चर्चा करण्यात आली. यावेळेस आयोगाचे सदस्य, अधिकारी व शिक्षण विभागाचे अधिकारी देखील उपस्थित होते.



Scanned with CamScanner




बालकां चे लैंगिक अपराधा पासून संरक्षण कायदा २०१२ चे कलम ४४ अन्वये, तसेच बाल न्याय मुलांची (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ चे कलम १०९ अन्वये, सदर कायद्याची अंमलबजावणी (MONITORING) करण्याचे उत्तरदायित्व महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडे आहे. याअनुषंगाने आयोगाने विभाग निहाय सदर कायदयाचे पुनरावलोकन करण्याचे अनुषंगाने राज्यात प्रथमच या प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमास सदर महसूली विभागातील सर्व जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण पथक, जिल्हा विशेष बाल संरक्षण पोलीस पथक, सर्व जिल्ह्याचे बाल कल्याण समितीचे अध्यक्ष व सदस्य, सर्व जिल्ह्याचे बाल न्याय मंडळाचे सदस्य, खाजगी स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी, चाईल्ड लाईन, महिला व बाल विकास विभागाचे आयुक्त व इतर वरिष्ठ अधिकारी, पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक तसेच पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचे प्रतिनिधी, बाल विकास व बाल हक्का संदर्भात कार्यरत इत्यादी मान्यवरांनी सहभाग घेतला होता.



Scanned with CamScanner



**कोकण विभाग पुनरावलोकन कार्यक्रम** :- कोकण विभागातील मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड, रत्नागिरी, सिंधुगुर्ग, पालघर या जिल्ह्यांचा पुनरावलोकन कार्यक्रम मुंबई येथे दि. २२ जून, २०२३ रोजी ओल्ड काऊंन्सिल हॉल या ऐतिहासिक वास्तुमध्ये संपन्न झाला. सदर कार्यक्रमास प्रमुख अतिथी मा. श्री. विद्याधर कानडे, सेवानिवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय मुंबई तसेच विदयमान लोकायुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी संबोधित केले. तसेच मा. श्री.दीपक पांडे, पोलीस महानिरिक्षक, महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य, अँड. सुशीबेन शाह, अध्यक्षा, श्री. शिवराज पाटील, (भा.प्र.से), सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग अँड. निलिमा चव्हाण, अँड. जयश्री पालवे, अँड. संजय सेंगर, अँड. प्रज्ञा खोसरे, श्रीम. सायली पालखेडकर, श्री. चैतन्य पुरंदरे सदस्य तसेच श्री. प्रमोद बाडगी, विधी सल्लागार, श्रीम. माधवी भोसले, अधीक्षक (म.शि.से), श्रीम. रोहिणी लाडे, प्रभारी प्रशासकीय अधिकारी तथा लेखाधिकारी, हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमा मध्ये पोक्सो व जेजे या दोन्ही अधिनियमांच्या अनुषंगाने जिल्हा निहाय प्राप्त माहितीच्या आधारे सादरीकरण व चर्चा करण्यात आली. त्यामध्ये श्री. संतोष शिंदे, विधायक भारती, तसेच श्रीम. ऑंड्री डिमेलो, मजलीस संस्था, आयोगाचे सर्व सदस्य यांनी उपस्थितां समवेत प्रश्न उत्तर स्वरूपात चर्चा केली व माहितीचे विश्लेषण करण्यात आले तसेच कायद्याची अमंलबजावणी करताना येणा-या अडचणी व प्रत्यक्ष परिस्थिती याबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली. सदर कार्यक्रमासाठी आय.जे.एम. या संस्थेने सदर दोन्ही अधिनियमांच्या अनुषंगाने माहितीपर पुस्तिका तयार केली होती. तिचे उपस्थितांना वाटप करण्यात आले.



Scanned with CamScanner







पुणे विभाग पुनरावलोकन कार्यक्रम : पुणे विभागातील पुणे, सोलापूर, कोल्हापूर,सांगली, सातारा या जिल्ह्यांकरिता पुणे येथे दि. ३० जून, २०२३ रोजी यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी येथे संपन्न झाला. सदर कार्यक्रमास प्रमुख अतिथी मा. श्री. अंकीत गोयल (भा.पो.से), पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, जिल्हा व सत्र न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री. श्याम चांडक, अतिरिक्त पोलीस आयुक्त, श्री. रामनाथ पोफळे, महिला व बाल विकास आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त श्री. राहुल मोरे, जिल्हा विधीसेवा प्राधिकरणाचे प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अँड. सुशीबेन शाह, अध्यक्षा, आयोगाच्या सदस्य अँड. निलिमा चव्हाण, अँड. जयश्री पालवे, अँड. संजय सेंगर, अँड. प्रज्ञा खोसरे, श्रीम. सायली पालखेडकर, श्री. चैतन्य पुरंदरे तसेच श्री. प्रमोद बाडगी, विधी सल्लागार, श्रीम. माधवी भोसले, अधीक्षक (म.शि.से), श्रीम. कल्पना खंबाईत, परिविक्षा अधिकारी, हे उपस्थित होते.



Scanned with CamScanner






मा. श्रीम. निलमताई गो-हे, उपसभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांनी सदर कार्यक्रमास ऑनलाईन उपस्थित राहून मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रम श्रीम. कॅरोलिन, होप फॉर चिल्ड्रन फाऊंडेशन व आयोग यांचे संयुक्त विदयमाने आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमा साठी विप्ला फाऊंडेशन या संस्थेने मनोधैर्य योजनेबाबत माहितीपर पुस्तिका तयार करून तिचे उपस्थितांना वाटप करण्यात आले. तसेच श्रीम. ऑड्री डिमेलो, मजलीस संस्था, आयोगाचे सर्व सदस्य यांनी उपस्थितां समवेत प्रश्न उत्तर स्वरूपात चर्चा केली व माहितीचे विश्लेषण करण्यात आले तसेच कायद्याची अमंलबजावणी करताना येणा-या अडचणी व प्रत्यक्ष परिस्थिती याबाबत विस्तृत चर्चा केली.



Scanned with CamScanner








छत्रपती संभाजी नगर विभाग पुनरावलोकन कार्यक्रम: या विभागातील छत्रपती संभाजी नगर, बीड,धाराशीव, जालना, परभणी, हिंगोली, लातूर, नांदेड या जिल्ह्यांच्या सदर पुनरावलोकन कार्यक्रम छत्रपती संभाजी नगर येथे जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह दि. २१ ऑगस्ट, २०२३ रोजी संपन्न झाला. सदर कार्यक्रमास प्रमुख अतिथी मा.डॉ. श्री. प्रशांत नारनवरे, (भा.प्र.से.) आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, श्री. पंकज कुमावत, पोलीस उप अधीक्षक, श्रीम. हर्षा देशमुख, विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग, छत्रपती संभाजी नगर हे उपस्थित होते.

तसेच महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे ॲड. सुशीबेन शाह, अध्यक्षा, ॲड. निलिमा चव्हाण, ॲड. जयश्री पालवे, ॲड. संजय सेंगर, अँड. प्रज्ञा खोसरे, श्रीम. सायली पालखेडकर, श्री. चैतन्य पुरंदरे सदस्य, श्री. शिवराज पाटील (भा.प्र.से), सचिव, हे उपस्थित होते. या कार्यक्रमास सरस्वती सेवाभावी संस्थेचे सहाय्य लाभले. तसेच श्रीम. ऑड्री डिमेलो, मजलीस संस्था, आयोगाचे सर्व सदस्य यांनी उपस्थितां समवेत प्रश्न उत्तर स्वरूपात चर्चा केली व माहितीचे विश्लेषण करण्यात आले तसेच कायद्याची अमंलबजावणी करताना येणा-या अडचणी व प्रत्यक्ष परिस्थिती याबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली.



Scanned with CamScanner




नाशिक विभाग पुनरावलोकन कार्यक्रम :- या विभागातील नाशिक, अहमदनगर, नंदूरबार,जळगाव, धुळे या जिल्ह्यांचा पुनरावलोकन कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. ५ डिसेंबर २०२३ रोजी संपन्न झाला. सदर कार्यक्रमास प्रमुख अतिथी जिल्हाधिकारी मा. जलज शर्मा, नाशिक ग्रामीण पोलिस अधीक्षक मा. शहाजी उमाप, अहिल्यानगर पोलिस अधीक्षक श्री. राकेश ओला, मुख्यकार्यकारी अधिकारी आशिम मित्तल उपस्थित होते.

तसेच सदर कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा, अँड. सुशीबेन शाह, अँड. संजय सेंगर, श्रीम. सायली पालखेडकर, सदस्य, उपस्थित होते.



Scanned with CamScanner

## आयोगामार्फत जानेवारी२०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत विविध प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात आले.

| अ.क्र. | दिनांक | ठिकाण | आयोजनात सहभागी यंत्रणा | विषय | वक्ते | प्रशिक्षणात सहभागी प्रशासकीय यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९ एप्रिल, २०२३ | गोयंका लॉं कॉलेज, अकोला | गोयंका लॉं कॉलेज, अकोला | बाल न्याय मुलांची (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ तसेच पोक्सो अँक्ट २०१२ | अॅड. श्री. संजय सेंगर | लॉं कॉलेजचे विद्यार्थी व वकील |
| २ | १९ एप्रिल, २०२३ | शेगाव | मनेवार समाज. अकोला | बाल न्याय मुलांची (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ तसेच पोक्सो अँक्ट २०१२ | अॅड. श्री. संजय सेंगर | नागरीकांसाठी |
| ३ | २ जुलै, २०२३ | चाईल्ड कंझरवेशन फाऊंडेशन, इंदौर, मध्य प्रदेश यांचे मार्फत ऑनलाईन नॅशनल वेबिनारचे आयोजन करण्यात आले. | चाईल्ड कंझरवेशन फाऊंडेशन, इंदौर, मध्य प्रदेश | पोक्सो अधिनियम | अॅड. श्री. संजय सेंगर | बाल कल्याण समितीचे अध्यक्ष व सदस्य, महाराष्ट्र , मध्य प्रदेश, खाजगी स्वयंसेवी संस्था, बाल संरक्षण क्षेत्रातील अनेक तज्ञ |
| ४ | ६ जुलै, २०२३ | अहमदाबाद, गुजरात | माँ फाऊंडेशन, अहमदाबाद, गुजरात | बाल न्याय मुलांची (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ तसेच पोक्सो अँक्ट २०१२ | अॅड. श्री. संजय सेंगर | गुजरात पोलीस |



Scanned with CamScanner

| अ.क्र. | दिनांक | ठिकाण | आयोजनात सहभागी यंत्रणा | विषय | वक्ते | प्रशिक्षणात सहभागी प्रशासकीय यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | २५ जुलै, २०२३ | भुसावळ | जिल्हा महिला बाल विकास अधिकारी व बाल कल्याण समिती | बाल न्याय मुलांची (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ तसेच पोक्सो अ‍ॅक्ट २०१२ | अ‍ॅड. श्री. संजय सेंगर | रेल्वे पोलीस |
| ६ | ११ ऑगस्ट, २०२३ | अकोला | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण | बाल न्याय मुलांची (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ तसेच पोक्सो अ‍ॅक्ट २०१२ | अ‍ॅड. श्री. संजय सेंगर | पोलीस व विशेष बाल पोलीस पथक |
| ७ | २७ ऑगस्ट, २०२३ | जालना | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण | बाल न्याय मुलांची (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ तसेच पोक्सो अ‍ॅक्ट २०१२ | अ‍ॅड. श्री. संजय सेंगर | पोलीस व विशेष बाल पोलीस पथक |
| ८ | २८ ऑगस्ट, २०२३ | मूर्तीजापूर, अकोला | I.S.W.S., स्वयंसेवी संस्था, गोंदिया | बाल विवाह प्रतिबंध कायदा, २००६ | अ‍ॅड. श्री. संजय सेंगर | ग्रामसेवक, अंगणवाडी ताई आणि खाजगी स्वयंसेवी संस्था, अंगणवाडी |
| ९ | २९ ऑगस्ट, २०२३ | अकोला | I.S.W.S., स्वयंसेवी संस्था, गोंदिया | बाल विवाह प्रतिबंध कायदा, २००६ | अ‍ॅड. श्री. संजय सेंगर | ग्रामसेवक, अंगणवाडी ताई आणि खाजगी स्वयंसेवी संस्था, अंगणवाडी |



Scanned with CamScanner

| अ.क्र. | दिनांक | ठिकाण | आयोजनात सहभागी यंत्रणा | विषय | वक्ते | प्रशिक्षणात सहभागी प्रशासकीय यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | ३१ ऑगस्ट, २०२३ | वाशिम | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण | बाल न्याय मुलांची (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ तसेच पोक्सो ॲक्ट २०१२ | ॲड. श्री. संजय सेंगर | पोलीस व विशेष बाल पोलीस पथक |
| ११ | २ व ३ सप्टेंबर, २०२३ | लोणावळा | संपर्क खाजगी स्वयंसेवी संस्था | जे जे ॲक्ट मधील संस्था बाह्य सेवा | ॲड. श्री. संजय सेंगर | बाल कल्याण समिती, खाजगी स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी |
| १२ | १ डिसेंबर, २०२३ | अकोला | अकोला पोलीस | बालकांचे कायदे | ॲड. श्री. संजय सेंगर | महाविद्यालयीन विद्यार्थी |
| १३ | ११ डिसेंबर, २०२३ | वर्धा | स्वराजमित्र खाजगी स्वयंसेवी संस्था | बालकांचे अधिकार | ॲड. श्री. संजय सेंगर | मुले आणि खाजगी स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी |
| १४ | २९ डिसेंबर, २०२३ | अमरावती | मिरॅकल फाऊंडेशन | बालगृहातील मुलांची काळजी | ॲड. श्री. संजय सेंगर | वाशिम, बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ जिल्ह्यातील, बालगृहातील कर्मचारी |



Scanned with CamScanner

# जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या वर्षाचा गोषवारा

| १ | वर्ष | २०२३-२४ |
|---|---|---|
| २ | वर्षाच्या सुरूवातीस प्रलंबित प्रकरणे | ८५३ |
| ३ | नवीन तक्रारी | ०६ |
| ४ | एकूण | ११ |
| ५ | निकाली काढलेली प्रकरणे | ०३ |
| ६ | वर्षाच्या शेवटी प्रलंबित प्रकरणे | ०२ |



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

## ९. लेखापरिक्षण अहवाल २०२३-२४

**सन २०२३-२४ चे लेखापरिक्षण कार्यवाहीत आहे.**

**सदर लेखापरिक्षण अहवाल वेगळ्याने सादर करण्यात येईल.**



Scanned with CamScanner

## स्वप्न बलशाली राष्ट्राचे बालमतांच्या सन्मानाचे

स्वप्न बालस्नेही महाराष्ट्राचे बालमतांच्या सन्मानाचे

बाल हक्क संरक्षण आयोग
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

३ रा मजला, शासकीय परिवहन सेवा इमारत, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई - ४०००३०

ई-मेल :- mscpcr@gmail.com • दूरध्वनी क्र. ०२२- २४९२०८९४

Scanned with CamScanner